# श्रावण घेवडा म्हणजे हमखास उत्पन्नाचा स्त्रोत



**प्रा. प्रवीण मांजरे**
(मो.नं. ८८८८३४८०५०)
**नेहा आरोलकर**
(पीएच.डी. स्कॉलर)
उद्यानविद्या विभाग,
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी





शेंगवर्गीय पिकांपैकी श्रावण घेवडा हे कमी दिवसांत जास्त उत्पादन देणारे पीक आहे. पीक हाती येण्यासाठी ७५ ते ९० दिवसांचा कालावधी लागतो. कमी पाण्यावर किंवा कमी पावसावर हे पीक येऊ शकते. शिवाय मध्यम ते हलक्या जमिनीतही येऊ शकते. शेंगवर्गीय पीक असल्यामुळे जमिनीची प्रत सुधारण्यास मदत होते. वरील सर्व बाबींचा विचार केल्यास शेतकऱ्यांसाठी हे एक फायदेशीर पीक ठरू शकते.

उत्तर भारतात लोकप्रिय असणारा राजमा- म्हणजेच श्रावण घेवडा किंवा फ्रेंचबीन ही बहुतेक सर्वच जणांना परिचित असलेली शेंगवर्गीय भाजी आहे. मोठ्या शहरातील ग्राहकांत कोवळ्या शेंगांची भाजी लोकप्रिय आहे. उत्तर भारतात या पिकाच्या वाळलेल्या दाण्यांपासून उसळीसारखी मसालेदार भाजी बनवतात. तिला राजमा असे नाव आहे. त्यामुळे हे पीक 'राजमा बीन्स' म्हणूनही ओळखले जाते.

महाराष्ट्रामध्ये अहमदनगर, सातारा, पुणे, नाशिक, सोलापूर येथे मोठ्या प्रमाणात श्रावण घेवड्याचे पीक घेतले जाते. त्याच्या कोवळ्या शेंगांची भाजी आणि सुकलेल्या दाण्यांची ऊसळ आपण बनवून खातो. या शेंगांमध्ये लोह, खनिजे आणि जीवनसत्व अ, ब मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. यामध्ये प्रथिनांचे प्रमाण २२ टक्के एवढे असते. शिवाय दाणे विविध रंगांचे आढळतात. आपल्याकडे प्रचलित जातींपैकी वाघ्या नावाची- वाघाच्या रंगासारखे पट्टे असलेली जात प्रसिद्ध आहे.

तसे पाहिले तर शेंगवर्गीय पिकांपैकी श्रावण घेवडा हे कमी दिवसांत जास्त उत्पादन देणारे पीक आहे. पीक हाती येण्यासाठी ७५ ते ९० दिवसांचा कालावधी लागतो. कमी पाण्यावर किंवा कमी पावसावर हे पीक येऊ शकते. शिवाय मध्यम ते हलक्या जमिनीतही येऊ शकते. शेंगवर्गीय पीक असल्यामुळे जमिनीची प्रत सुधारण्यास मदत होते. वरील सर्व बाबींचा विचार केल्यास शेतकऱ्यांसाठी हे एक फायदेशीर पीक ठरू शकते.

**जमीन व हवामान** : महाराष्ट्रातील पाऊसमान आणि जमिनीचा विचार केल्यास हे पीक घेण्यास भरपूर वाव आहे. पाण्याचा निचरा होणाऱ्या मध्यम ते भारी जमिनीत श्रावण घेवड्याची वाढ चांगली होते. दुष्काळी भागातील मध्यम प्रतीच्या जमिनीत चांगला पाऊस झाल्यास भरपूर आणि अगदीच कमी पाऊस झाल्यास या पिकाचे अल्पसे पण हमखास उत्पादन मिळते. जमिनीचा सामू ५.५ ते ६ च्या दरम्यान असावा. भारी जमिनीत उन्हाळी व रब्बी पीक





घ्यावे. महाराष्ट्रातील ७० ते ८० सें.मी. पाऊस असलेल्या भागात हे पीक चांगले येते. कोकणखेरीज इतर ठिकाणी पाण्याची सोय असल्यास हे पीक बाराही महिने चांगले येऊ शकते. पण उन्हाळ्यात पेरणीस उशीर झाल्यास कडक उन्हामुळे फुलगळ होऊन उत्पादनात घट येते. म्हणून खरीप हंगामात हे पीक घेणे फायदेशीर आहे. १५ ते ४० अंश सेल्सिअस तापमान या पिकास उत्तम ठरते. अतिथंड व अतिउष्ण हवामान घेवडा पिकास मानवत नाही. थंड व पावसाळी हंगाम या पिकास अनुकूल आहे.

**पूर्वमशागत** : घेवडा हे पीक चांगले उत्पादनशील असल्याने आडवी व उभी नांगरट योग्य रितीने करून कुळवाच्या पाळ्या देऊन ढेकळे फोडून जमीन चांगली भुसभुशीत करावी. ढेकळे फुटल्यानंतर हेक्टरी २० ते २५ टन शेणखत घालून २ ते ३ कुळवाच्या पाळ्या द्याव्यात.

**सुधारित जाती** : घेवड्याच्या पुढील जाती लागवडीयोग्य आहेत. अर्का कोमल, कंटेडर, पुसा पार्वती, पंत अनुपमा, फुले सुरेखा याशिवाय वाघ्या, चंपा, एच.पी.आर.- ३५, ६७ इत्यादी जाती प्रसिद्ध आहेत.

**लागवड हंगाम, अंतर व बियाणे** : तिन्ही हंगामात महाराष्ट्रामध्ये हे पीक घेतले जाऊ शकते. महाराष्ट्रातील हवामान लक्षात घेता खरीप हंगामासाठी जून व जुलै महिना उत्तम ठरतो, तर रब्बी हंगामासाठी सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात पेरणी करावी. पाण्याची सोय असल्यास उन्हाळ्यातही हे पीक घेता येते. उन्हाळी हंगामासाठी जानेवारी व फेब्रुवारी महिना उत्तम ठरतो. पण कडक उन्हामुळे फुले गळून पडतात आणि उत्पादन कमी येते. खरीप हंगामात पाऊस पडून गेल्यावर पाभरीने किंवा तिफणीने पेरणी करावी. दोन ओळींमध्ये ३० सें.मी. व दोन रोपांमध्ये १५ सें.मी. अंतर ठेवावे. २ ते ३ सें.मी. खोलीवर बिया टोकण पद्धतीने पेराव्यात. प्रतिहेक्टरी ६० ते ७० किलो बियाणे वापरावे. जर तुम्ही टोकण पद्धतीने लागवड करत असाल तर प्रतिहेक्टर २५ ते ३० किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी बियाण्यास

रायझोबिम जिवाणूसंवर्धक लावावे. उन्हाळी हंगामात बियांची पेरणी ६० ते ७० सें.मी. अंतरावर सरी वरंब्यावर करावी. पीक उगवून आल्यावर १५ ते २० दिवसांनी एक खुरपणी करावी.

**आंतरमशागत** : खरीप हंगामात पिकाची पेरणी केल्यानंतर १५ दिवसांनी विरळणी करावी. खरीप हंगामात तणांचा योग्य वेळी बंदोबस्त करणे आवश्यक आहे. १ ते २ खुरपण्या देऊन तण काढावे किंवा पेरणीपूर्वी तणनाशकाची फवारणी करावी. खरीप हंगामात जास्त प्रमाणात पाऊस झाल्यास आणि योग्य प्रमाणात पाण्याचा निचरा न झाल्यास चर खोदून पाणी शेताबाहेर काढून द्यावे.

**खत व पाणी व्यवस्थापन** : सर्वसाधारणपणे हेक्टरी ७२० किलो बियाण्याचे आणि ६३० किलो पाल्याचे उत्पादन देणाऱ्या श्रावण घेवड्याचे पीक जमिनीतून ६६ किलो नत्र २७ किलो स्फुरद आणि ५५ किलो पालाश शोषून घेते. निरनिराळ्या प्रयोगांवरून घेवड्याच्या पिकासाठी शेणखत आणि रासायनिक खतांच्या मात्रांची शिफारस खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

या पिकास प्रतिहेक्टरी ४० टन शेणखत, ५० ते ५४ किलो नत्र, ५० ते १०० किलो स्फुरद, ५० ते ११० किलो पालाश द्यावे लागते. स्फुरद आणि पालाश पूर्ण आणि अर्धा नत्र पेरणीच्या वेळी द्यावा आणि उरलेला अर्धा नत्र बी उगवल्यानंतर तीन ते चार आठवड्यांनी द्यावा. पिकाची मुळे जमिनीत उथळ वाढत असल्यामुळे पिकाला जास्त पाणी दिल्यास ते मुळांना अपायकारक ठरते. मात्र फुलोऱ्याच्या वेळी जमिनीत पुरेसा ओलावा नसल्यास फळधारणा कमी प्रमाणात होते. म्हणून घेवड्याच्या पिकांना फुले येण्याआधी पाणी दिले पाहिजे. पावसाळ्यात जमिनीतील पाण्याचा निचरा होईल याची दक्षता घ्यावी. खरीप हंगामात पिकास पाणी देण्याची गरज भासत नाही. परंतु पाऊस नसल्यास गरजेनुसार पाणी दिले गेले पाहिजे. उन्हाळ्यात ८ ते १० दिवसांच्या अंतराने आणि जमिनीच्या मगदुरानुसार पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

**कीडनियंत्रण**

**मावा** : ही कीड घेवड्याच्या पानांतील रस शोषून घेते. त्यामुळे पानांच्या कडा वळतात. मावा कीड वाढणाऱ्या फांद्या आणि लहान पानांतील रस शोषून घेते. या किडीच्या प्रादुर्भावामुळे काही वेळा फुलांची गळ होते.

**उपाय** : मावा किडीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात सायपरमेथ्रिन (२५ टक्के प्रवाही) ५ मि.लि. किंवा १० मिलिलिटर रोगोर (३० टक्के प्रवाही ) या प्रमाणात पाण्यात मिसळून फवारावे.

**शेंगा पोखरणारी अळी** : ही कीड प्रथम शेंगांच्या पृष्ठभागावर आढळून येते. ही कीड नंतर शेंगेच्या आत शिरून आतील दाणे खाऊन फस्त करते.

**उपाय** : या किडीचा उपद्रव दिसून येताच ५ टक्के कार्बरिल दर हेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावे.

**खोडमाशी** : लागवडीनंतर १५ ते २० दिवसांत या किडीचा मोठ्या प्रमाणावर उपद्रव होतो. या किडीचे मादी फुलपाखरू पीक पहिल्या दोन पानांवर असताना पानांवर अंडी घालते. अंडी उबवल्यानंतर अंड्यामधून अळ्या बाहेर पडतात. अळी खोडावर जाते आणि खोडाच्या आतील भाग पोखरून खाते. या किडीचे सुप्तावस्थेत कोष जमिनीलगत खोडामधून पडतात.

**उपाय** : खोडमाशीच्या अळीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात ५ मिलिलिटर सायपरमेथ्रिन (२५ टक्के प्रवाही) हे कीटकनाशक मिसळून फवारणी करावी.

**रोगनियंत्रण**

**भुरी** : हा रोग बुरशीमुळे होतो. या रोगाची पिकाला लागण झाल्यास पानांवर, काड्यांवर आणि शेंगांवर पांढरी पावडर असलेले ठिपके दिसतात.

**उपाय** : घेवड्यावरील भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ३०० मेश गंधकाची भुकटी दरहेक्टरी ३० किलो या प्रमाणात धुरळावी.

**तांबेरा** : तांबेरा हा बुरशीजन्य रोग असून, त्यात पानांच्या खालच्या भागावर तांबूस काळपट रंगाचे फोड येतात.

**उपाय** : तांबेरा रोगाच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात २० ग्रॅम डायथेन एम-४५ हेक्टरी बुरशीनाशक मिसळून रोगाची लागण दिसून येताच फवारणी करावी.

**मर** : मर (विल्ट) हा बुरशीजन्य रोग असून या रोगाची पिकाला लागण झाल्यास झाडांची पाने पिवळी पडून ती गळतात.

**उपाय** : मर रोगाच्या नियंत्रणासाठी बियाण्यास पेरणीपूर्वी बुरशीनाशक औषध चोळावे किंवा रोगप्रतिबंधक जाती लावाव्यात.

**काढणी आणि उत्पादन**

लागवड केल्यापासून ६ ते ७ आठवड्यात शेंगा तोडणीस येतात. नुकतेच बी तयार होऊ लागलेल्या कोवळ्या शेंगा तोडून बाजारात पाठवतात. या पिकाचे ४ ते ५ तोडे मिळतात. हेक्टरी सरासरी उत्पादन २७ क्विंटलपर्यंत घेता येते. ■